पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 3
21 Jun 2025

# ‘शाहू’तील विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड

**लातूर :** येथील राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सायबर शिक्षा सायबर सुरक्षा हा उपक्रम मागील तीन वर्षापासून लातूर व जवळपासच्या जिल्हयात राबविण्यात येत आहे. यावर्षी या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. सी.एस. व बी.एस्सी. सी.ए. वर्गातील यज्ञेश शिंदे (प्रेसिडेंट), शैलेश जामगे (सेक्रेटरी), गायत्री हुडगे (कम्युनिटी डायरेक्टर) व जीत बुधोडकर (मीडिया डायरेक्टर) या विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. प्रा.ज्योती माशाळकर व प्रा. श्रध्दा पवार यांची टीचर कॉर्डिनेटर म्हणून निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर, अजय शिर्के व गायत्री केसकर यांनी या उपक्रमाची सखोल माहिती विद्यार्थ्यांना व शिक्षकांना दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या निवडीबद्दल शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ देशमुख, सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजीत यादव व प्रा. विश्वनाथ पांचाळ यांनी अभिनंदन केले.

